मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पालिका भरती: पात्र उमेदवारांना रुजू करा!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाकडे मागणी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महापालिका भरती प्रक्रियेतील नव्याने भरती प्रक्रिया करुन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांना तात्काळ रुजू करुन घ्यावे, अशी मागणी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.






याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजावर प्रचंड ताण असून, मनुष्यबळ भरती अपरिहार्य आहे. राज्य सरकारने नोकर भरतीवरील निर्बंध उठवल्यानंतर महापालिकेच्या विविध विभागांतील 'ब' आणि 'क' गटातील १५ पदांच्या ३८८ जागांसाठी परीक्षा घेतली होती. त्यासाठी राज्यभरातून ८५ हजाराहून अधिक उमेदवारांनी अर्ज केले होते. महापालिकेने अतिरिक्त कायदा सल्लागार, विधी अधिकारी, उप मुख्य अग्निशमन अधिकारी, विभागीय अग्निशमन अधिकारी, उद्यान अधीक्षक (वृक्ष), उद्यान निरीक्षक, हॉर्टिकल्चर सुपरवायझर, न्यायालय लिपिक, ॲनिमल किपर, समाजसेवक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, लिपिक, आरोग्य निरीक्षक, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विद्युत) या संवर्गातील रिक्त जागांसाठी प्रशासनाने भरती प्रक्रिया राबवली आहे. त्याची परीक्षा झाली असून, उमेदवारांना नियुक्ती देणे प्रलंबित आहे.

दरम्यान, संबंधित उमेदवारांना रुजू करुन न घेतल्यामुळे तक्रारी येत आहेत. प्रशासकीय कामकाजाला गती देण्यासाठी, तसेच पात्र उमेदवारांना न्याय देण्यासाठी तातडीने रुजू करुन घ्यावे, अशीही मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.


> **“पिंपरी - महापालिका नोकर भरतीमध्ये पात्र झालेल्या ३८८ उमेदवारांना अद्याप रुजू करण्यात आलेले नाही. प्रशासनाच्या सर्वच विभागामध्ये रिक्त पदांसाठी ही भरती प्रक्रिया राबवली होती. पुरेशा मनुष्यबळाअभावी प्रशासकीय कामकाजावर ताण येत आहे. दुसरीकडे, पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबत तक्रारी सुरू झाल्या आहेत. याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी आणि संबंधित उमेदवारांना रुजू करुन घ्यावे, अशी सूचना केली आहे.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# दिघी आळंदी रोडवर जाळपोळ!

## जाळपोळीमुळे वाहतूक काही काळ खोळंबली

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** दिघे आळंदी रोडवर बॅनर आणि टायरची जाळपोळ करण्यात आली. ही घटना सोमवारी (दि. ३०) सायंकाळी बनाचा ओढा येथे घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, दिघी आळंदी रोडवर सोमवारी सायंकाळी काही नागरिकांनी बॅनर आणि टायर जाळले. घटनेची माहिती मिळताच दिघी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तोपर्यंत जाळपोळ करणारे नागरिक घटनास्थळावरून निघून गेले होते. त्यामुळे ही जाळपोळ नेमकी कोणी केली याबाबत नेमकी माहिती मिळू शकली नाही. दरम्यान, रस्त्यावर झालेल्या जाळपोळीमुळे वाहतूक काही काळ खोळंबली. बॅनर आणि टायर बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरू करण्यात आली. यामुळे वाहनांच्या काही अंतरापर्यंत रांगा लागल्या होत्या.



### दिघी पोलिसांनी घटनास्थळी धाव

» दघी आळंदी रोडवर सोमवारी सायंकाळी काही नागरिकांनी बॅनर आणि टायर जाळले. घटनेची माहिती मिळताच दिघी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तोपर्यंत जाळपोळ करणारे नागरिक घटनास्थळावरून निघून गेले होते. त्यामुळे ही जाळपोळ नेमकी कोणी केली याबाबत नेमकी माहिती मिळू शकली नाही. दरम्यान, रस्त्यावर झालेल्या जाळपोळीमुळे वाहतूक काही काळ खोळंबली.

# अपघातग्रस्त महिला व चिमुकल्यांना आ. अश्विनी जगतापांनी केली मदत

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या मायेचा प्रत्यय आज पिंपरी चिंचवडकरांना बघायला मिळाला. अश्विनी लक्ष्मण जगताप यांना माई या नावाने पिंपळे गुरव परिसरात ओळखले जाते. त्याच आमदार माईंनी अपघातग्रस्त कुटुंबाला मायेचा हाथ पुढे करत स्वतः च्या गाडीतून रुग्णालयात नेले. आमदार जगताप यांच्या मदतीमुळे त्यांच्यातील माणुसकीचे आज दर्शन घडले. आज त्या पिंपळे सौदागर रस्त्यावरून जात असताना महिला आणि तिच्या दोन लहान मुलांचा अपघात झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तात्काळ त्यांनी गाडी थांबून त्यांची विचारपूस केली. लहानग्याला पाणी देखील पिण्यास विचारले. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. नावाप्रमाणेच आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप या त्यांच्या मदतीला धावून गेल्या. तातडीने त्यांना स्वतःच्या गाडीतून रुग्णालयात नेण्याची व्यवस्था केली. शहरामध्ये अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होते आणि याच वाहतूक कोंडीचा फटका अपघातग्रस्त महिला आणि मुलांना बसला. ऐनवेळी आमदार अश्विनी जगताप या मदतीला धावून आल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांना पाठिंब्यासाठी भक्ती-शक्ती चौकात कँडल मार्च

## मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्याची मागणी



**निगडी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यात यावे, यासाठी (छळसवळ) अंतरवली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांना पाठींबा दर्शविण्यासाठी सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने निगडी येथील भक्ती शक्ती चौकात कँडल मार्चचे आयोजन करण्यात आले होते. या मार्चमध्ये अबालवृद्धांसह तरुण व महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.


यावेळी उपोषणकर्ते आणि आंदोलकांच्या वतीने भक्ती शक्ती येथील संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज याच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून या कँडल मार्चची सुरुवात करण्यात आली. टाळ-मृदंग, मेणबत्या आणि मशाली घेत हा मार्च भक्ती शक्ती स्मारकाला तीन फेऱ्या मारून उद्यानाच्या बाहेर मार्गक्रमण करत भक्ती शक्ती चौकात विसर्जित झाला. यावेळी अनेक सहभागी आंदोलकांनी विचार मांडले. तसेच 'एक मराठा, लाख मराठा' 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा घोषणा देण्यात आल्या.उद्या सकाळी १० वाजता चिंचवड गावातील संत मोरया गोसावी विसर्जन घाटावर सरकारचे प्रतीकात्मक श्राध्द घालण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले आहे. यावेळी उद्या शहरात चक्का-जाम करण्याबाबत सकल मराठा समाजाच्या वतीने निर्णय घेण्यात येणार असल्याचेही अयोजकांनी सांगितले.

यावेळी बोलतांना सामाजिक कार्यकर्ते मारोती भापकर म्हणाले, माझ्यासह शहरतील सर्व मराठा समाजाच्या ३१ नगरसेवक, आमदार,खासदार यांनी कुणबी असल्याचे दाखले काढून घेतले आहे. त्यामुळे या मार्च मध्ये कोणीही उपस्थित झाले नाहीत. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी राज्यातील विविध भागातील पुढा-यांनी राजीनामा दिला आहे. शहरातील अण्णा, दादा, अप्पा, ताई हे कधी राजीनामा देणार आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# घंटागाडी ठेकेदारांना दिवाळीपूर्वी विशेष बक्षिस!

## २९३ ठेकेदारांना प्रत्येकी ३० हजार रुपये





**शहराची निवड होऊन प्रथम क्रमांकाचे पारितोषिक**

» **भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाने अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फरन्स २०२३ साठी शहरी वाहतूक विभागांमध्ये नाविन्यपूर्ण विषयांवर काम करणाऱ्या महानगरपालिका, मेट्रो कार्पोरेशन, बस कार्पोरेशन यांच्याकडून प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये भारतातील अनेक शहरांमधून पिंपरी चिंचवड शहराची निवड होऊन प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आज पिंपरी चिंचवड महानगर पालिकेस बहाल करण्यात आले.**

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाने अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फरन्स २०२३ साठी शहरी वाहतूक विभागांमध्ये नाविन्यपूर्ण विषयांवर काम करणाऱ्या महानगरपालिका, मेट्रो कार्पोरेशन, बस कार्पो रेशन यांच्याकडून प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये भारतातील अनेक शहरांमधून पिंपरी चिंचवड शहराची निवड होऊन प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आज पिंपरी चिंचवड महानगर पालिकेस बहाल करण्यात आले. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हा पारितोषिक स्वीकारला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विना वाहन वापर (एन एम टी) धोरणास आणि पिंपळे सौदागर परिसर, सांगवी-किवळे रस्ता व नाशिक फाटा – वाकड रस्ता यावरील सायकल मार्ग व पादचारी मार्ग इत्यादी पूरक सुविधांचा अहवाल केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाकडे सादर केला होता. त्याआधारे हा पारितोषिक भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयचे सचिव मनोज जोशी यांच्या हस्ते आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिल्ली येथील माणिक शॉ सेंटर येथे आयोजित केलेल्या १६ व्या शहरी वाहतूक विकास परिषदेत स्वीकारला. यावेळी समारंभाच्या वेळी महापालिकेच्या वतीने प्रकल्प विभागाचे सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, उप अभियंता सुनील पवार, आयटीडीपीचे प्रांजल कुलकर्णी तसेच डिझाईन शाळा चे संचालक आशिक जैन उपस्थित होते.

# रेल्वे स्थानकावर आता स्वस्तात पाणी!

## पाच रुपयांत एक लीटर



**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणे रेल्वे स्थानकावर प्रवाशांना अखेर काही महिन्यांनंतर पुन्हा स्वस्तात पाणी मिळू लागले आहे. रेल्वे प्रशासनाने रेल्वे स्थानकावर वॉटर व्हेंडिंग यंत्रे बसविली आहेत. त्यातून प्रवाशांना पिण्याचे स्वच्छ पाणी पाच रुपये लीटर दराने मिळत आहे. पुणे रेल्वे स्थानकावर सुमारे वर्षभरापूर्वी इंडियन रेल्वे केटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशनने (आयआरसीटीसी) दोन वॉटर व्हेंडिंग यंत्रे बसविली होती. मात्र, काही महिन्यांपूर्वी ही यंत्रे बंद पडली होती. आता नव्याने पुन्हा यंत्र बसविण्यात आली आहेत. रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकवर या सुविधेचे उद्घाटन विभागीय रेल्वे व्यवस्थापिका इंदू दुबे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे प्रवाशांना पाच रुपयांत एक लीटर पाणी मिळू लागले आहे. रेल्वे स्थानकावरील वॉटर व्हेंडिंग यंत्रे बंद असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. प्रवाशांना पिण्याच्या पाण्याचे नळ होते. परंतु, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छता होती. याचबरोबर या नळांच्या भोवतालीही अस्वच्छता पसरली होती. यामुळे अनेक प्रवाशांना पाण्याच्या बाटल्या विकत घ्याव्या लागत होत्या. रेल्वे प्रशासनाने स्वस्तात पाणी देण्याची सुविधा तातडीने सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत होती.

> “पुणे रेल्वे स्थानकावरील वॉटर व्हेंडिंग यंत्रे बंद असल्याबाबत सातत्याने आयआरसीटीसीकडे पाठपुरावा केला होता. तसेच रेल्वेच्या विभागीय सल्लागार समितीच्या बैठकीतही मुद्दा उपस्थित केला होता. अखेर रेल्वेने या बाबत कार्यवाही करून नवी यंत्रे कार्यान्वित केली.
> – निखिल काची,
> सदस्य, विभागीय रेल्वे सल्लागार समिती

# आंदोलकांनी फोडल्या ६० बस!

## अखेर बीडमध्ये संचारबंदी लागू

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात सुरू असलेल्या आंदोलनाला बीडमध्ये हिंसक वळण लागलं आहे. संतप्त आंदोलकांनी सर्वपक्षीय नेत्यांच्या घरांवर दगडफेक केली आणि त्यांची घरं, कार्यालयं पेटवली. यानंतर बीड बस स्थानकात उभ्या असलेल्या जवळपास ६० बसची तोडफोड करण्यात आली आहे. आंदोलकांनी बस स्थानकातील कंट्रोल रूमही फोडली आहे. बस स्थानकात उभ्या असलेल्या बसची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करण्यात आली आहे.बीडमधल्या हिंसक आंदोलनानंतर संचारबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी संचारबंदीच्या आदेशाचं पत्र काढलं आहे. तसंच



सर्वसामान्यांना त्रास झाला तर पोलीस आता गुन्हे दाखल करून आंदोलकांवर कडक कारवाई करतील, असा इशारा बीडचे पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिला आहे. तसंच पोलिसांना बळाचा वापर करावा लागल्याची कबुली पोलीस अधिक्षकांनी दिली. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या तसंच रबर फायर आणि लाठीचार्ज केल्याचं त्यांनी सांगितलं. मराठा आंदोलकांच्या टार्गेटवर बीडचे सर्वपक्षीय नेते असल्याचं पाहायला मिळालं. या नेत्यांच्या घरांवर तसंच कार्यालयांवर दगडफेक करण्यात आली आणि जाळपोळही केली गेली. माजलगावमध्ये आंदोलकांनी राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरावर दगडफेक करत जाळपोळ केली. प्रकाश सोळंके यांचे बंधू धैर्यशील सोळंके यांचा बीड शहरातील सुंदर बंगला आंदोलकांनी पेटवला. कार्यालय आणि बंगल्यावर दगडफेक करून पेटवण्यात आलं. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचं कार्यालय आणि बंगला आंदोलकांनी पेटवून दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड शहरातील कार्यालयही पेटवण्यात आलं. भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचं कार्यालय फोडून फर्निचर पेटवण्यात आलं. छगन भुजबळ यांचे कार्यकर्ते आणि समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष राऊत यांचं सनराईज हॉटेल आंदोलकांनी फोडून पेटवलं. शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष कुंडलिक खांडे यांचं नगर नाक्यावरील कार्यालयही आंदोलनकर्त्यांनी फोडलं. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या घरावर दगडफेक करत असताना पोलिसांनी आंदोलकांवर अश्रू धुराच्या नळकांड्या फोडल्या.

# साइड मार्जिन सोडण्याची अट शिथिल करावी!

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
शहराच्या दाट वस्ती आणि गावठाण भागात बांधकाम करताना १८ मीटर पेक्षा जास्त खोली असलेल्या भूखंडावर साइड मार्जिन सोडण्याची सक्ती करणारे परिपत्रक आयुक्तांनी रद्द करावे. या अटीमुळे अनेक जुन्या वाड्यांचा पुनर्विकास करताना अडचणी निर्माण झाल्या आहेत, अशी मागणी स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने यांनी आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे केली आहे. गावठाण भागामध्ये बांधकाम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आजपर्यंत अनेक इमारतींना कोणतेही साइड मार्जिन न सोडता बांधकामास मंजुरी मिळत होती. परंतु युडीसीपीआर नियमावली मध्ये बदल झाल्याने १५ मिटर उंचीच्या वरील इमारत बांधायचे असले तरी एक मिटर साइड मार्जिन सोडणे बंधनकारक होते.त्यावर हरकत घेतल्यानंतर मे २०२३ मध्ये शासनाने आदेश काढला आहे. त्यामध्ये बांधकामामध्ये अडचण निर्माण झाल्यास अशा ठिकाणी शिथिलता देण्याचे अधिकार आयुक्तांना दिले आहेत. महापालिकेने यासंदर्भात परिपत्रक काढले असले तरी पुरेशी सवलत दिलेली नाही. या परिपत्रकानुसार ही सवलत फक्त १८ मिटर खोली पर्यंतच्या म्हणजेच ६० फूट खोली असणाऱ्या मिळकतीनांच लागू होत आहे. त्याचा फटका अनेक वाड्यांना बसला आहे. त्यामुळे १८ मीटरची अट शिथिल करावी अशी मागणी रासने यांनी केली आहे.

# ससून रुग्णालयातून ललित पाटीलचे पलायन ; कामकाजावर प्रश्नचिन्ह ?

## ससून रुग्णालयात पुन्हा कैदी रुग्ण समितीची पुनर्रचना

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून सर्वोपचार रुग्णालयातील कैदी रुग्ण समितीचे अध्यक्ष डॉ. सुजित धिवारे यांनी हे पद नको असल्याचे पत्र अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना दिले आहे. त्यामुळे आता पुन्हा कैदी रुग्ण समितीची पुनर्रचना करावी लागणार आहे. या समितीची पुनर्रचना गेल्या महिन्यातच २६ सप्टेंबरला करण्यात आली होती. त्यामुळे ससून मधील कैदी रुग्ण समितीच्या पुनर्रचनेचा फेरा अजून काही दिवस सुरूच राहणार असल्याची स्थिती आहे. आतापर्यंत कैदी रुग्ण समितीच्या अध्यक्षपदी रुग्णालयाच्या अधीक्षकांची नियुक्ती करण्यात येत होती. मात्र चालू वर्षात आतापर्यंत तीन अधीक्षक बदलण्यात आले आहे. समितीच्या अध्यपदाची जबाबदारी अधीक्षकांना न देता उपअधीक्षकांना देण्याचा निर्णय अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी २६ सप्टेंबरला घेतला होता. त्यानुसार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. धिवारे यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र यानंतर २ ऑक्टोबरला अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेला. यानंतर ललितची रुग्णालयात महिनोंमहिने बडदास्त ठेवण्यासाठी उपचारांचे कागदी घोडे नाचविण्यात आल्याचेही समोर आले आहे. ललित प्रमाणेच इतरही कैद्यांची रुग्णालयात बडदास्त ठेवण्यात येत असल्याचे दिसून असल्याने कैदी समितीच्या कामकाजावर प्रश्न चिन्हे निर्माण झाले आहे. त्यामुळे या समितीमध्ये काम करण्यास कोणी इच्छुक नसल्याची स्थिती आहे.




डॉ. धिवारे यांनी दिलेल्या पत्रावर अद्याप अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी निर्णय घेतलेला नाही, असे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. समितीचे सध्याचे अध्यक्ष डॉ. धिवारे यांच्याकडे उअधीक्षक पदांचा कार्यभार आहे. तसेच त्यांच्याकडे रुग्णालयातील औषध विभागाचीही जबाबदारी आहे. रुग्णालयात उपचारांसाठी दाखल होणारे कैदी मेडिसीन, अस्थिरोग, सर्जरी, श्वसनरोग या विभागांमध्ये दाखल होण्याचे प्रमाण जास्त आहे. सध्याचे अध्यक्ष या विभागांमध्ये कार्यरत नाहीत. परिणामी कैद्याला दाखल आणि डिस्चार्ज देताना अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे मेडिसीन, अस्थिरोग, सर्जरी किंवा स्त्रीरोग या विभागामधील वरिष्ठ प्राध्यापकाची समितीच्या अध्यपदी नियुक्ती करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### उपचार केल्याचे केवळ कागदी घोडे

» आतापर्यंत कैदी रुग्ण समितीच्या अध्यक्षपदी रुग्णालयाच्या अधीक्षकांची नियुक्ती करण्यात येत होती. मात्र चालू वर्षात आतापर्यंत तीन अधीक्षक बदलण्यात आले आहे. समितीच्या अध्यपदाची जबाबदारी अधीक्षकांना न देता उपअधीक्षकांना देण्याचा निर्णय अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी २६ सप्टेंबरला घेतला होता. त्यानुसार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. धिवारे यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र यानंतर २ ऑक्टोबरला अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेला. मला सदस्य म्हणून समितीत स्थान देण्याची मागणी केली आहे, असे कैदी रुग्ण समितीचे अध्यक्ष डॉ. सुजित धिवारे यांनी सांगितले. यानंतर ललितची रुग्णालयात महिनोंमहिने बडदास्त ठेवण्यासाठी उपचारांचे कागदी घोडे नाचविण्यात आल्याचेही समोर आले आहे.

# संतांनी उपदेशाबरोबर प्रश्न विचारण्याचा वारसा जपला!

## अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अविनाश पाटील यांचे वक्तव्य

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पाश्चात्य विवेकवादी परंपरेपेक्षा भारतीय विवेकवादी परंपरा ही समृद्ध आहे. बुद्ध, चार्वाक, संत आणि सुधारकांची विवेकवादी परंपरा जैविक आहे, असे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष अविनाश पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी संतांनी केवळ उपदेश केला नसून प्रश्न विचारण्याचा वारसा जपला, असंही नमूद केलं. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जन्मदिनानिमित्त महा. अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेने 'संतविचार, संविधानिक मूल्ये व विवेकवादी परंपरा' या विषयावर एकदिवसीय शिबिर आयोजित केले होते. त्याच्या उद्घाटन सत्रात अविनाश पाटील बोलत होते.





अविनाश पाटील म्हणाले, माणूस हा भावना आणि विचारांचे मिश्रण आहे. भारतीय विवेकवादी परंपरेत भावना आणि विचारांचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे ती परंपरा मानवी जगणे उन्नत करण्यासाठी उपयुक्त आहे. पाश्चात्य विवेकवादी परंपरा ही अधिक तर्ककठोर आणि विचारांवर आधारलेली असल्याने ती मनुष्याला बांधून ठेवण्यात कमी पडत आहे. संत सुधारकांचा वारसा कालसुसंगतपणे समजून घेण्याची गरज आहे. तो समाज सुधारणेचा भाग आहे. तो समाज बदलाची प्रक्रिया म्हणून महत्वाचा आहे. संतांनी केवळ उपदेश केला नसून प्रश्न विचारण्याचा वारसा जपला आहे. संतांनी केलेली मांडणी ही आजच्या एकूणच धर्मांधतेला उत्तर देण्यास प्रभावी आहे, हे सप्रमाण सांगून अत्यंत सडेतोड, तर्कसुसंगत मांडणी धम्मकीर्ती महाराजांनी केली. जागतिक पातळीवर विज्ञान दृष्टिकोन विकसित झालेला नव्हता तेव्हा १२ व्या शतकात भारतात संत परंपरेने भावनेला साद घालत तर्कशुद्ध आणि कार्यकारणभाव असलेली मांडणी केली.